ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे

इ. ५वी प्रवेश प्रक्रिया ओघ तक्ता – २०२६

ऑनलाईन प्रक्रिया

संकेतस्थळावर अर्ज काळजीपूर्वक भरावा व शुल्क ऑनलाईन भरावे. शुल्क नेट बँकिंग, क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा वॉलेटद्वारा भरता येईल. पावतीची व प्रवेशपत्राची प्रत लगेचच ईमेलने मिळेल.

१. अर्ज मिळविणे, भरणे
मुदत: दि. ७ ते १४ नोव्हेंबर २०२६

आपला अर्ज आम्हाला आपोआपच मिळालेला असेल. आपल्याला आवश्यकता वाटल्यास त्याची प्रत काढून ठेवावी.

२. अर्ज दाखल करणे

आपल्या मेल बॉक्समध्ये आलेल्या प्रवेशपत्राची प्रत काढावी व त्यावर प्रकाशचित्र चिकटवावे. हे प्रवेशपत्र परीक्षेच्या दिवशी आवश्यक असते. दुपारचा जेवणाचा डबा द्यावा.

३. प्रवेशपत्र मिळविणे

४. प्रवेश चाचणीला उपस्थित राहणे
चाचणी : मंगळवार दि. १७ नोव्हेंबर २०२६
सत्र १ – ११.३० ते १.३०
सत्र २ – २. ०० ते ४.००
जेवण्याची सुट्टी – १.३० ते २.००

५. निकाल संकेतस्थळावर जाहीर केला जाईल.

निवड यादी संकेतस्थळावर उपलब्ध होईल. तसा संदेश भ्रमणभाषवर येईल.
क्रमांक ०२० - २४२०७१२१
वर संपर्क करावा.

६. सोमवार दि. २३ नोव्हेंबर २०२६ शाळा सुरू

ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे

५वी प्रवेश चाचणीविषयी पालकांना सूचना

१. विद्यार्थ्यांनी आपल्याला मिळालेल्या सत्रानुसार चाचणीपूर्वी ३० मिनिटे हजर राहावे. सत्राची वेळ **प्रवेशपत्रावर** पाहावी.

२. **दि. १७** नोव्हेंबर चाचणीच्या वेळी येताना प्रकाशचित्र लावलेले प्रवेशपत्र, काळ्या रंगाचे दोन बॉलपेन्स, टोक केलेल्या दोन पेन्सिली, खोडरबर, टोकयंत्र आणावे.

३. योग्य रांगेत योग्य क्रमांकावर बसवून घेण्यासाठी विद्यार्थ्याला त्याच्या प्रवेशपत्रावरील **गटक्रमांक** आणि **आसनक्रमांक** चांगल्या प्रकारे लक्षात असणे आवश्यक आहे . **तसेच** त्या विद्यार्थ्याचे छायाचित्र लावलेले प्रवेशपत्र **त्याच्याजवळ असणे आवश्यक आहे.**

४. पालकांनी विद्यार्थ्यांच्या हातात आवश्यक साहित्य व प्रवेशपत्र देऊन त्याला दिलेल्या परीक्षा केंद्रावर सोडल्यानंतर चाचणी संपेपर्यंत विद्यार्थ्याची सर्व काळजी प्रबोधिनीतील अध्यापक आणि कार्यकर्ते घेत असतात. सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या सत्रानुसार रांगांमध्ये बसवून घेतले जाते आणि नंतर एकेका गटाला रांगेने चाचणीसाठी वर्गात नेले जाते. पालकांनी शाळेच्या आवारात थांबू नये.

५. पालकांना वर्गात जाण्यास अनुमती नसते.

६. चाचणी संपल्यानंतरही विद्यार्थ्यांना रांगेने तळमजल्यावर नेले जाते. आपल्या पाल्यास घेऊन जाण्यासाठी पालकांनी पाल्याला सोडलेल्या दारापाशी यावे.

७. कोणत्याही परिस्थितीत चाचणीचे सत्र बदलून मिळणार नाही.

८. उत्तरपत्रिका संगणकाद्वारे तपासली जाणार असल्याने विद्यार्थ्यांना योग्य उत्तराच्या ठिकाणी काळ्या शाईच्या बॉलपेनाने गोल भरावयाचा आहे. त्याचा सराव विद्यार्थ्यांकडून अवश्य करून घ्यावा. नमुन्यादाखल खाली उत्तर पत्रिका दाखविली आहे.

९.

